||संस्कृतीरक्षति: स्त्रीशक्ति:||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा

ता.चोपडा, जि.जळगांव

स्थापना वर्ष-१९९४



# वार्षिक अहवाल

## वर्ष २०२३-२४


सुंदरगढी, चुंचाळे रोड,ता.चोपडा,
जि.जळगांव

फोन नं.०२५८६-२२३०१७

Website - www.bmcswchopda.org    e-mail- bmcsw.chopda@gmail.com

## भगिनी मंडळ चोपडा संचलित,

## समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

## - <u>महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल- 2023-24</u>

**दिनांक- 11/06/2023- मा.अरुणभाई गुजराथी व श्री.विठ्ठलभाई गुजराथी (मोठे काका) यांच्या वाढदिवसानिमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन-**



रक्तदान शिबिरात समाजकार्य मविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी या शिबिरात एकूण ३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

**दिनांक- 1/06/2023- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार व समानसंधी कार्यशाळा सहभाग**

**मार्गदर्शन-**डॉ.प्रशांत नारनवरे (भाप्रसे) आयुक्त, समाजकल्याण, पुणे श्री.माधव वाघ, प्रादेशिक उपायुक्त, नाशिक, श्री.राकेश महाजन, उपायुक्त, जिल्हा जात पडताळणी, जळगाव

**सहभाग- डॉ.अनंत देशमुख, श्री.सोमनाथ बारी, श्री.अजय बारी**

**ठिकाण-** कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**आयोजक-** सहा.आयुक्त, समाजकल्याण जळगाव






**दि. २१ जून, २०२३ आंतराष्ट्रीय योग दिवस साजरा**

महाविद्यालयात दि. २१ जून, २०२३ रोजी विद्यापीठामार्फत प्राप्त झालेल्या सूचनेनुसा योग दिवस साजरा करण्यात आला. त्यासाठी विद्यापीठ मार्फत Zoom App व्दारे प्राप्त झालेल्या सूचनानुसार सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.





**दि. 26 जून, २०२३ छत्रपती शाहू महाराज जयंती- सामाजिक न्याय दिन साजरा-**

आज रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त तसेच सामाजिक न्याय दिन निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




**दि. 16 जुलै, २०२३ पद्मश्री श्री.पोपटराव पवार यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट-**

आज पद्मश्री श्री.पोपटराव पवार, माजी सरपंच, हिवरेबाजार यांचा भगिनी मंडळ संकुलातर्फे समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे स्वागत सत्काराचा कार्याक्रम घेण्यात आला होता. त्यात महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी आपली ओळख करून देऊन महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी संस्थेतील सर्व विभागप्रमुख शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मान्यवरांची उपस्थिती होती.





G-20 युवा संवाद भारत @2047 संमेलनात सहभागी समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम.



**दि. 30 जुलै, २०२३ 'रोटरॅक्ट क्लब व विद्यार्थी विकास विभागातर्फे वृक्षारोपण'**

रोटरॅक्ट क्लब ऑफ चोपडा व समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्यावतीने ३० जूलै ते ३ ऑगस्ट दरम्यान 'वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. याचा शुभारंभ समाजकार्य महाविद्यालयाच्या आवारात उपप्राचार्य तथा सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.आशिष गुजराथी यांच्याहस्ते वृक्षारोपण करून झाला. यानंतर रामगोपाल गोशाळा, समाजकार्य महाविद्यालय व शासकीय विश्रामगृह या परीसरात वड, जांभूळ, कडुलिंब, पिंपळ या वृक्षांची लागवड करण्यात आली या कार्यक्रमाअंतर्गत चोपडा शहरासह ग्रामीण भागात विवीध वृक्षांची ट्रि - गार्ड सह लागवड करून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी रोटरॅक्ट क्लब स्वीकारत आहे. यावेळी रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष अनिल बाविस्कर, सचिव गौरव जैन, खजिनदार मयूरेश जैन, माजी अध्यक्ष दिव्यांक सावंत, सदस्य मयांक जैन, ॲड.प्रणव ठाकरे, योगेश चौधरी, सौरभ ठाकरे यांच्यासह समाजकार्य महाविद्यालयातील प्रा.डॉ.विनोद रायपूरे, कार्यालय अधीक्षक सोमनाथ बारी, लेखापाल अमोल गुजराथी, नितीन पवार, देवेंद्र पाटील, कैलास महाजन आदी उपस्थित होते.







**दि. 01 ऑगस्ट, २०२३ समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथे महापुरुषांना अभिवादन....**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महापुरुषांना अभिवादन करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी संस्थेच्या अध्यक्षा मा.सौ.पुनमताई गुजराथी यांच्या हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांचे प्रेरणास्थान, उद्योगपती आदरणीय आशिषभाई गुजराथी यांच्या हस्ते साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी, सर्व प्राध्यापक - प्राध्यापकेतर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी हजर होते



**दि. ०९ ,ऑगस्ट २०२३ 'आदिवासी दिनानिमित्त बिरसाजी मुंडा यांना अभिवादन....**




आज रोजी आदिवासी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बिरसाजी मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**दिनांक 29 ऑगस्ट 2023 - Grand Salute to ISRO कार्यक्रम**




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या निर्देशानुसार आज दिनांक 29 ऑगस्ट 2023 रोजी सकाळी 11 वाजता भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे भारताने नुकत्याच चंद्रयान-3 च्या केलेल्या यशस्वी प्रक्षेपणा बाबत इस्रोच्या शास्त्रज्ञांचे अभिनंदन करण्यासाठी महाविद्यालयात “Grand Salute to ISRO” कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी प्रा . याप्रसंगी . नारसिंग वळवी यांनी प्रास्ताविक केले उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व प्राचार्य,उपप्राचार्य यांनी Grand Salute तसेच राष्ट्रगीत व भारत मातेच्या जयघोष केला याप्रसंगी .60 विद्यार्थी, महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉसौंदाणकर .,उपप्राचार्य डॉआशिष गुजराथी ., प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**<u>मानवाधिकार या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन:-</u>**

दि. 26/08/2023 रोजी सकाळी ठिक 11.00 वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये ‘मानवाधिकार’ या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यासाठी चोपडा येथील सुप्रसिद्ध कायदेतज्ञ मा.ॲड. निर्मलजी देशमुख हे उपस्थित होते. त्यांनी मानवाधिकार या विषयावर अतिशय सविस्तर अशी माहिती आपल्या विद्यार्थ्यांना दिली. त्यामध्ये भारतीय



राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व घटनेने दिलेले मानवाधिकर याविषयी घटनेतील विविध संदर्भीत कलमांचा उल्लेख करुन सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी कार्यशाळेसाठी उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व सन्माननीय प्राध्यापक यांनीही उपस्थित राहुन या कार्यशाळेत सहभाग घेतला. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून सर्व आयोजन व नियोजन महाविद्यालयाचे प्रोफेसर डॉ. विष्णु गुंजाळ यांनी केले. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन एम.एस.डब्ल्यु.

द्वितीय वर्षाचे विद्यार्थी श्री. अनिल बाविस्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. अरुण भोई यांनी केले. अशाप्रकारे मानवाधिकार या विषयावरील कार्यशाळा संपन्न झाली.

**दि. 02/09/2023 आर्थिक साक्षरता या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन:-**

आज महाविद्यालयात आर्थिक साक्षरता या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून चोपडा पीपल्स बँकेचे शाखाधिकारी श्री.नितेश पोतदार यांना आमंत्रित करण्यात आले होते. यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची हितगुज साधत असताना विद्यार्थ्यांना बँकिंग विषयी माहिती दिली. त्यामध्ये एनएफटी, आरटीजीएस, करंट अकाउंट, सेविंग अकाउंट, केवायसी, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, रिकरिंग डिपॉझिट, पोस्टाचे व्यवहार याविषयी उदाहरणासह माहिती दिली. योग्य प्रकारे गुंतवणूक कशी करावी, शेअर मार्केट, एसआयपी, म्युच्युअल फंड, डिमॅट अकाउंट, याविषयी माहिती दिली. त्यानंतर मेडिकल इन्शुरन्स, टर्म इन्शुरन्स, डीसीएस या संदर्भात विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन केले. त्यानंतर इन्कम टॅक्स कशा पद्धतीने भरावा, यासाठी काय करावे, याविषयी उदाहरण सह स्पष्टीकरण दिले. कोणकोणत्या ठिकाणी आपण पैसे गुंतवून इन्कम टॅक्स मध्ये सूट करू शकतो. त्याबाबतच्या नियम अटी काय, याची विस्तृत माहिती दिली. त्यानंतर प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाची शेवटी डॉ. रायपूर यांनी आभार मानले.




**समाजकार्य महाविद्यालयातर्फे आभाकार्ड नोंदणी अभियान:-**




बीएसडब्ल्यू व एमएसडब्ल्यू अभ्यास्कामाच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्र कार्यांतर्गत चोपडा तालुक्यातील वैजापूर येथे आभा कार्ड नोंदणी अभियान राबवण्यात आले. आभा कार्ड नोंदणी अभियानासाठी प्रा.डॉ.आशिष गुजराथी व प्रा.नारसिंग वळवी यांनी क्षेत्र कार्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वैजापूर व खार्यापाडाव या ठिकाणी 52 व्यक्तींची नोंदणी करण्यात आली. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

**दिनांक- ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन'**

या निमित्त आपल्या महाविद्यालयात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकवृंदाना 'रोटरॅक्ट क्लब,ऑफ चोपडा व MSW द्वितीय वर्षाचे विद्यार्थी' यांच्यावतीने शुभेच्छापत्र देवून सन्मानित करून शिक्षक दिन साजरा करण्यात आला.



**दि.15 सप्टेबर 2023, शुक्रवार रोजी जॉब प्लेसमेंट करीता** कॅम्पस इंटरव्हू चे आयोजन भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा, जि. जळगाव येथे करण्यात आले होते. समता फाऊंडेशन, मुंबई ही सेवाभावी संस्था संपुर्ण महाराष्ट्रात आरोग्य क्षेत्रात काम करते. जळगाव जिल्हयात समता फाऊंडेशन, मुंबई या संस्थेच्या कडून, आरोग्य विभागात काम करण्यासाठी 'हेल्थ ऑफिसर' हे पद भरण्याकरीता आपले संस्थेचे प्रतिनिधी यांनी महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कॅम्पस इंटरव्हयू करीता नोंदणी केलेल्या 26 विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.







**दिनांक-१५/०९/२०२३ निबंध स्पर्धा उत्साहात संपन्न'***

*विद्यार्थी विकास विभाग, समाजकार्य महाविद्यालय, चोपडा व नेहरू युवा केंद्र, जळगाव -(चोपडा तालुका) निमीत्त महाविद्यालयात २०२३-यांच्या वतीने हिंदी पखवाडा'कैच द रेन' या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत जलसंधारण काळाची गरज, पाणी आडवा - पाणी जिरवा व जल ही जीवन है या विषयांवर ! .विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले ४५ यात प्रथम क्रमांक अंकिता कोळी )MSW First), व्दितीय कु सपना पाटील. )MSW Second) व तृतीय कु) व्हाणदिपाली च.TYBSW) यांनी प्राप्त केला. विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले व सहभागी सर्व स्पर्धकांना आकर्षक असे सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.





आपण वाचत आहात देशातील सर्वात विश्वासार्ह अन् प्रथम क्रमांकाचे वृत्तपत्र

# दिव्य मराठी

जळगाव | रविवार, १७ सप्टेंबर २०२३

## समाजकार्य महाविद्यालयात हिंदी दिनानिमित्त निबंध स्पर्धा

प्रतिनिधी | चोपडा

नेहरू युवा केंद्र, विद्यार्थी विकास विभाग आणि समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने हिंदी पखवाडा- २०२३ निमित्त महाविद्यालयात 'कैच द रेन' निबंध स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेत ४५ विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले. यात प्रथम क्रमांक अंकिता कोळी, द्वितीय सपना पाटील व तृतीय दीपाली चव्हाण यांनी प्राप्त केले. प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य प्रा.डॉ. आशिष गुजराथी, डॉ. विष्णू गुंजाळ, डॉ.अनंत देशमुख, प्रा.नरसिंग वळवी, डॉ. विनोद रायपुरे, डॉ. राहूल निकम, डॉ. मारोती गायकवाड, डॉ. उत्तम सोनकांबळे, डॉ. मोहिनी उपासनी, डॉ. संबोधी देशपांडे आदी उपस्थित होते. यशस्वितेसाठी परेश चित्ते, अनिल बाविस्कर, डिगंबर धनगर, रोहित रायसिंग, वैभव चव्हाण, अजित भिल, राकेश महाजन यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अनिल बाविस्कर यांनी तर प्रा. वळवी यांनी आभार मानले.

समाजकार्य महाविद्यालयात निबंध स्पर्धेतील विजयी विद्यार्थिनी.

**दिनांक- 25/09/2023 समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिवस आणि 'मेरी माटि - मेरा देश' उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न---**


भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापन दिवस आणि मेरी माटी - मेरा देश उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर होते. कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे नवनिर्वाचित चोपडा विभाग समन्वयक प्रा. डॉ. दिलीप गिऱ्हे होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा डॉ. आशिष गुजराथी हे होते. यावेळी विचारपीठावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. राहुल निकम , राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संबोधी देशपांडे, प्रा.डॉ. मोहिनी उपासनी आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वर्धापन दिनाविषयी आणि वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागात सहभागी व्हावे असे आवाहन केले. राष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या "मेरी माटी - मेरा देश" या उपक्रमाबद्दल थोडक्यात माहिती दिली. मेरी माटी - मेरा देश या उपक्रमाचे महत्व समजावून सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकसित करण्याची चळवळ असल्याचे मत व्यक्त केले. सामाजिक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वपूर्ण असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे मत मांडले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. आशिष गुजराथी यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे राष्ट्र विकासाची चळवळ असल्याचे प्रतिपादन करीत विद्यार्थ्यांना रासेयो वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील प्रा.डॉ. मोहिनी उपासनी यांची खानदेश इतिहास संकलन संस्थेत पदाधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, नियोजनसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. संबोधी देशपांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी रासेयो स्वयंसेवकांना व सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि मार्गदर्शन केले. मेरी माटी - मेरा देश या उपक्रमाबद्दल माहिती सांगितली. या वेळी विचारपिठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी राष्ट्राप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मंचावर ठेवलेल्या अमृत कलशात एक एक मुठ माती टाकली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापक इतर कर्मचाऱ्यांनी आणि रासेयो स्वयंसेवकांसह सर्व विद्यार्थ्यांनी अमृत कलशात एक मूठ माती टाकत राष्ट्राप्रती कृतज्ञता, समर्पण, त्याग आणि निष्ठेची भावना प्रकट केली.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेविका कल्याणी महाजन यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवक आणि प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**दि.01/10/2023 रोजी स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत श्रमदान**




समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथील रासेयो स्वयंसेवक आणि सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ईश्वर सौदाणकर सर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ राहूल निकम, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संबोधी देशपांडे स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत श्रमदान करताना.

**02ऑक्टबर-2023 , महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचा जन्मदिवस-**




महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आदरांजली अर्पण करतांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.आशिष गुजराथी सोबत रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संबोधी देशपांडे आणि महाविद्यालयातील प्रा.डॉ. विष्णू गुंजाळ, प्रा.डॉ.अनंत देशमुख, प्रा. नारसिंग वळवी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**दिनांक-०५/१०/२०२३ खान्देश स्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजन-**




समाजकार्य महाविद्यालय चोपडा रोटरेक्ट क्लब ऑफ चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने समाजकार्य महाविद्यालय येथे युगपुरुष स्वामी विवेकानंद खान्देशस्तरीय वकृत्व स्पर्धा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जळगाव धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील 43 स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ सिनेट माजी सदस्य सौ.पूनम गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉक्टर ईश्वर सौंदाणकर उपस्थित होते. रोटरी क्लबचे अध्यक्ष चेतन टाटा, सचिव अर्पित अग्रवाल, पंकज बोरोले, गौरव महाले, सतीश अहिरे तर परीक्षक म्हणून एस. बी. पाटील, प्रीतम निकम यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेच्या यशस्वी साठी डॉ.आशिष गुजराथी

प्रा.नारसिंग वळवी] अनिल बाविस्कर, सदस्य प्राध्यापक गोपाल बडगुजर, लखन पाटील आदींनी परिश्रम घेतले.

**दिनांक-१२/१०/२०२३ देवगिरी आश्रम शाळेतील शिबिरात विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी आयोजन-**

समाजकार्य महाविद्यालय चोपडा व वैजापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील देवगिरी येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. यात महविद्यालयातील बीएसडब्ल्यू तृतीय वर्ष एम एस डब्ल्यू द्वितीय वर्ष च्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्याच्या माध्यमातून कार्यक्रम घेतला. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असल्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी शिबिरांचे आयोजन केले होते. शिबिरास वैजापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळा अधिकारी श्री.राजेंद्र रणाळकर व तंत्रज्ञ प्रमोद ठाकरे यांचे सहकार्य लाभले. यावेळी श्री.राजेंद्र रणाळकर यांनी विद्यार्थ्यांना रक्तातील हिमोग्लोबिनच्या प्रमाणाचे महत्त्व काय व ते किती असावे ते संतुलित ठेवण्यासाठी आपण कोणता आहार घ्यावा. याविषयी मार्गदर्शन केले. या शिबिरात 25 मुले व 40 मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.



**विद्यापीठ स्तरीय युवक महोत्सव (युवारंग2023) दिनांक 7 ते11 ऑक्टोबर 2023**

कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामार्तर्फे आयोजित युवारंग 2023 युवक महोत्सव हा के.स. ई. सोसायटीचे मूळजी जेठा महाविद्यालय जळगाव येथे घेण्यात आला. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या संघाची नोंदणी करून 05 विद्यार्थी व 02 संघव्यवस्थापकांनी सहभाग नोंदविला. युवक महोत्सव 2023 23 मध्ये खालील विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारात सहभाग नोंदविला.




1) यश पंढरीनाथ जगताप MSW-I- वादविवाद
2) कल्याणी सावंत महाजन-MSW-I – वादविवाद
3) पूजा देविदास पाटील MSW-I वक्तृत्व
4) मावली अलिशिबा ठोग्न्या -मेहंदी
5) भोये उषा दिलीप MSW-I स्पॉट पेंटिंग

युवक महोत्सवांमध्ये वादविवाद वक्तृत्व स्पॉट पेंटिंग मेहंदी इत्यादी कला प्रकारात सहभाग नोंदविला यासाठी संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. नारसिंग वळवी व डॉ.मोहिनी उपासनी यांचे मार्गदर्शन लाभले.

**दि. १३/१०/२०२३ नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ:-**

भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालयात दि. १३/१०/२०२३, वार शुक्रवार रोजी सकाळी ९ वाजता बीएसडब्ल्यू प्रथम वर्ष व एमएसडब्ल्यू प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित



करण्यात आला होता. सदर कार्यक्रमांमध्ये बीएसडब्ल्यू द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी आणि एमएसडब्ल्यू द्वितीय वर्षाचे विद्यार्थी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आले.

## दिनांक. 26/10/2023- ऑक्टोबर/नोव्हेंबर विद्यापीठ परीक्षा प्रारंभ-....

**दि. 26/10/2023 चहार्डी येथे आदिवासी भिल्ल वस्तीत क्षेत्रकार्यातंर्गत किशोरवयीन मुलींचे हिमोग्लोबीन,सी.बी.सी.आणि सिकलसेल तपासणी शिबीर.**

भगिनी मंडळ चोपडा, संचलित समाज कार्य महाविद्यालय चोपडा जि जळगाव व प्राथमिक आरोग्य केंद्र चहार्डी यांच्या संयुक्त विद्यमाने चहार्डी गावातील आदिवासी भिल्ल वस्तीतील किशोरवयीन मुलींची सिकलसेल व CBC आणि हिमोग्लोबीन रक्त तपासणी शिबिर क्षेत्रकार्य सुपरवायझर प्रोफेसर डॉ.विष्णू रामदास गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाने यशस्वी संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.गुंजाळ यांनी आपल्या प्रास्ताविकात या शिबिराचा उद्देश, महत्व व आवश्यकता आणि समाजकार्य महाविद्यालयाची भूमिका याबद्दल सविस्तर माहिती दिली. या शिबिरात एकूण 65 किशोरवयीन मुली व 30 वर्षाच्या आतील वय असलेल्या महिलांची रक्त तपासणी करण्यात आली. या शिबिरात प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी श्री.किशोर पाटील सर श्री.पवनभाऊ सपकाळे श्री. संजय पारधी, अंगणवाडी सेविका धनगर मॅडम व समाजकार्य महाविद्यालयाचे एम.एस.डब्ल्यू.द्वितीय व प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





**दिनांक-31/10/2023- राष्ट्रीय एकता दिवस - मोठ्या उत्साहात साजरा**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ हे होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने भारताचे पहिले गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. आपल्या भाषणात प्रा.डॉ.राहुल निकम यांनी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख उपस्थितांसमोर मांडला त्यांच्या जीवनकार्याची ओळख विद्यार्थ्यांना व उपस्थितांना करून दिली. सोबतच भारताच्या पोलादी महिला म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय विद्यार्थी तसेच उपस्थित त्यांना करून दिला.




यावेळी प्रा.डॉ. राहुल निकम यांनी विद्यार्थ्यांना व सर्व उपस्थित प्राध्यापक प्राध्यापके तर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. प्रा.डॉ. विष्णू गुंजाळ यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य सर्व भारतीयांना अभिमानास्पद असल्याचे नमूद केले. त्यांच्यापासून धडा घेऊन सर्वांनीच त्यानुसार कार्य केले पाहिजे असे नमूद केले. प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या धाडसी कार्याचा दाखला विद्यार्थ्यांना दिला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.राष्ट्रीय एकता शपथचे महत्व विशद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौदानकर आणि उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांनी सर्व उपस्थितांना राष्ट्रीय एकता दिनाच्या शुभेच्छा कळविल्या. कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

आभार प्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी केले कार्यक्रमास बहुसंख्य प्राध्यापक प्राध्यापक इतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**26/10/2023- विद्यापीठ स्तरीय ऑक्टो/नोव्हें.-२०२३ BSW परीक्षा प्रारंभ**

**२२/११/२०२३ MSW- परीक्षा प्रारंभ**

**दिनांक 6 डिसेंबर 2023 विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन पर कार्यक्रम संपन्न...**




समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. अभिवादन कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे वरिष्ठ प्रा. नारसिंग वळवी, विद्यार्थी विकास अधिकारी यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकेतून विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती उपस्थितांना करून दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्याअर्पण करण्यात आले. त्यांनी बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धर्माची महंती आपल्या शब्दातून विशद केली. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थी अभिवादन कार्यक्रमास उपस्थित होते.

**०३ जानेवारी २०२४, सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस-**




सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आदरांजली अर्पण करतांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.आशिष गुजराथी सोबत रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संबोधी देशपांडे आणि महाविद्यालयातील, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**12 जानेवारी २०२४, राष्ट्रपुरुष स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांचा जन्मदिवस**

आज राष्ट्रपुरुष स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमांना माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख वक्ते श्री.जितेंद्र जोशी यांचे स्वागत व सत्कार विद्यार्थी विकास विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक नारसिंग वळवी व सहायक कार्यक्रमाधिकारी तथा महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.






**दिनांक- 8 ते 13 जानेवारी 2024- आत्मनिर्भर युवती अभियान-**

युवती सभाअंतर्गत दि 8 ते 13 जानेवारी 2024 दरम्यान आत्मनिर्भर युवती अभियान दि.8/1/2024 रोजी व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक मा. कावेरी कमलाकर मॅडम यांनी सायबर क्राईम व सोशल मीडिया यावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.दि.10/1/2024 रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ चोपडा येथील समन्वयक मा. श्री सलीम तडवी यांनी स्वयंरोजगार व शासकीय योजना या संदर्भात विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.दि.11/1/2024 रोजी माननीय सौ अपूर्वा कुलकर्णी मॅडम यांनी सुखी जीवनासाठी योगाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले. दि.12/1/2024 रोजी मा श्री.जितेंद्र जोशी यांनी व्यक्तिमत्व विकास व पर्यावरण जनजागृती या विषयावर मार्गदर्शन केले. दि.13/1/2013 रोजी पुणे येथील आयुर्वेद चिकित्सक वैद्य प्राजक्ता राजपूत -महाले यांनी आहार व गर्भसंस्कार या विषयी मार्गदर्शन केले. दुपारी 3.00 वाजता कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मोराणे समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ विष्णू गुंजाळ हे होते त्यांनी विद्यार्थ्यांशी युवती व आत्मनिर्भरता या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभागाचे सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.आशिष गुजराथी , कार्यक्रम अधिकारी प्रा.नारसिंग वळवी यांनी कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी काम पाहिले.







**दिनांक 18 जानेवारी 2024 - आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धा 2023-24**




थोर स्वातंत्र्य सेनानी परम श्रद्धेय गोवर्धनदास भिकारीदास शाह उर्फ बाबाजी यांच्या स्मृती प्रीत्यर्थ विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा गुरुवार दिनांक 18 जानेवारी 2024 रोजी घेण्यात आली.स्पर्धेचे उद्घाटन दिपप्रज्वलन व स्वर्गीय बाबाजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटक म्हणून दंडाधिकारी तथा तहसीलदार चोपडा तालुका मा.श्री.भाऊसाहेब थोरात हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चोपडा शहरातील प्रसिद्ध उद्योगपती माननीय श्री आशिषभाई गुजराथी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या अध्यक्षा मा.सौ.पुनम गुजराथी, उपाध्यक्षा सौ. छायाबेन गुजराथी, मा.पूजा पाडील्यार मॅडम, सहाय्यक अभियंता पाटबंधारे विभाग, चोपडा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ईश्वर सौंदानकर, उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी हे होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ईश्वर सौंदानकर यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर विनोद रायपुरे यांनी केले तर उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक नर्सिंग वळवी यांनी केले.

स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या विविध महाविद्यालयातील 7 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. वक्तृत्व स्पर्धेतचे विषय म्हणून- १)राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व शिक्षणापुढील आव्हाने. २)भारताचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रभाव ३)भारतीय समाजावर पडणारे बदलत्या राजकीय व्यवस्थेचे पडसाद ४)शिक्षण व महिला सबलीकरण हे होते.






**दिनांक-२५/०१/२०२४ ते ३१/०१/२०२४ राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर-**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा शुभारंभ अनुदानित आश्रम शाळा बोरअजंटी ताचोपडा येथे झाला. शिबिर शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ.दिलीप गिरहे हे होते. शिबिराचे उद्घाटक माजी स्वातंत्र्यसैनिक सुभाष शिरसाट आणि संदीप बडगुजर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बोरअजंटी गावाचे पोलिस पाटील प्रवीण सुलताने, अनुदानित माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक भगवान भालेराव हे होते. यावेळी विचारपीठावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम आणि महिला कार्यक्रम अधिकारी प्राडॉ.संबोधी देशपांडे हजर होते. शिबिराकरिता पन्नास शिबिरार्थी उपस्थित आहेत.







**दिनांक-२५/०१/२०२४ राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा -**

तहसील कार्यलय चोपडा व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजन करण्यात आले होते स्पर्धेचे उद्घाटन डॉ.संजय चौधरी, मुख्याध्यापक प्रेरणा मतिमंद विद्यालय चोपडा, यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.विनोद रायपुरे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व समाजकार्य महाविद्यालय प्राचार्य ईश्वर सौंदानकर, उद्घाटक संजय चौधरी, प्रमुख अतिथी सचिन बाळंबे- नायब तहसीलदार तसेच परीक्षक डॉ.किशोर पाठक, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, श्री.संजय बारी, महिला मंडळ माध्यमिक विद्यालय व प्रा. गोपाल बडगुजर कला, वाणिज्य, महाविद्यालय चोपडा यांचे स्वागत करण्यात आले. राष्ट्रीय मतदार दिवससाच्या, मतदारांसाठी असलेल्या प्रतिज्ञेचे वाचन केले. प्रमुख अतिथी व अध्यक्ष यांनी मतदार

दिनाचे महत्त्व याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी- १)आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का २)लोकशाही आणि तरुण मतदार ३)मतदानाची सक्ती करावी का ४)व्यवस्था बदलाचा राजमार्ग : मताधिकार या विषयावर अतिशय प्रभावीपणे आपले मत व्यक्त केले. स्पर्धे करता एकूण सहा मिनिटाचे वेळ देण्यात आला होता. स्पर्धेअंती माननीय नायब तहसीलदार श्री सचिन कांबळे यांनी निकाल जाहीर केला. त्यात १)करीना विजय शंभरकर, पंकज महाविद्यालय-प्रथम २)परेश विश्वनाथ पाटील, कला वाणिज्य महाविद्यालय चोपडा- द्वितीय ३)दिपाली विकास पाटील समाजकार्य महाविद्यालय-तृतीय असे पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आलीत.






**दिनांक- ०१/०२/२०२४ ते ०३/०२/२०२४ जिल्हास्तरीय साहस कार्यशाळा -**




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग व समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय साहस कार्यशाळेचे आयोजन दिनांक- ०१/०२/२०२४ ते ०३/०२/२०२४ दरम्यान करण्यात आलेले आहे. वैजापूर येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा येथे जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळेचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ.संजय पाटील उद्घाटक म्हणून लाभले. तसेच आश्रम शाळेचे अधीक्षक श्री.सुहास देवराज हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले. उपशिक्षक श्री.राठोड, तडवी मॅडम महिला अधीक्षक टेंभुर्णे मॅडम, साहस कार्यशाळेचे कार्यक्रमाधिकारी समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.आशिष गुजराथी, महिला समन्वयक प्राध्यापक डॉ.मोहिनी उपासनी, महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक डॉ.विनोद रायपुरे, विद्यार्थी विकास विभागाचे संयोजक श्री.अजय पाटील, प्राध्यापक डॉ.दत्तात्रय करट पवार आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी सदिच्छा दिल्या. विद्यार्थी विकास विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.आशिष गुजराथी यांनी विद्यार्थ्यांना कार्यशाळेसंदर्भात माहिती दिली. साहस कार्यशाळेत आल्यानंतर कशा पद्धतीने आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये चांगला बदल होईल, आपल्यामध्ये नेतृत्व गुण निर्माण होतील याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी

स्वयंसेवक म्हणून सेवा देत आहेत. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विनोद रायपुरे यांनी केले तर डॉ.मोहिनी उपासनी यांनी आभार मानले.

**दिनांक- ११/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ शैक्षणिक सहल/ संस्थाभेट (एम.एस.डब्ल्यू.-द्वितीय वर्ष)-**

विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार एम.एस.डब्ल्यू.-द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाची शैक्षणिक सहल/ संस्थाभेट दिनांक- ११/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ या कालावधीत दिल्ली, कटरा, वैष्णोदेवी, जम्मू, हरिद्वार, अमृतसर या ठिकाणी घेण्यात आली होती.






**दिनांक- १३/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ ग्रामीण शिबीर (एम.एस.डब्ल्यू.व बी.एस.डब्ल्यू.-प्रथम वर्ष)-**

विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार **एम.एस.डब्ल्यू.व बी.एस.डब्ल्यू.-प्रथम वर्ष** अभ्यासक्रमाचे **ग्रामीण शिबीर** दिनांक- १३/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ या कालावधीत वैजापूर, ता.चोपडा, जि.जळगाव या ठिकाणी घेण्यात आले आहे.





**दिनांक- १७/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ शैक्षणिक सहल/ संस्थाभेट (एस.वाय.बी.एस.डब्ल्यू.)-**

विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार एस.वाय.बी.एस.डब्ल्यू. वर्ष अभ्यासक्रमाची शैक्षणिक सहल/ संस्थाभेट दिनांक- १७/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ या कालावधीत कोकण विभाग या ठिकाणी घेण्यात आली होती.







भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, ता.चोपड़ा, जि.जळगाव येथील B.S.W.- S.Y. द्विितिय वर्ष विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल (Study Tour) पुणे, लोणावळा, पाली, मुरुड- जंजिरा किल्ला, हरिहरेश्वर समुद्रकिनारा, श्रीवर्धन बीच, रायगड किल्ला, पाचाड, क्रांतिभूमी चवदार तळे, महाड, चिपळूण, देवरुख, गणपतीपुळे समुद्रकिनारा याठिकाणी रोजी आयोजित करण्यात आली होती.

**<u>दिनांक- 28 व 29 फेब्रुवारी,2024- </u> "साद-प्रतिसाद" विविध कला गुण दर्शक सांस्कृतिक कार्यक्रम-**

विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयातर्फे 'साद-प्रतिसाद' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे त्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विवीध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केल.




**दिनांक- ०७/०३/२०२४ वकृत्व स्पर्धांचे आयोगान-**

जल जीवन मिशनच्या प्रभावी प्रचार व प्रसिद्धी करिता पंचायत समिती चोपड़ा व भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय,चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय स्तरावरील वकृत्व स्पर्धांचे आयोगान महाविद्यालयात करण्यात आले होते. परीक्षक म्हणून सोबत डॉ देशमुख सर व सौ. नीता पाटील मॅडम होत्या. महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री प्रा.आशिष गुजराथी सर व पंचायत समिती चोपड़ा चे समन्वयक श्री जितेंद्र महाजन यांनी सूत्रबद्ध पद्धतीने कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. मोहिनी उपासनी यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी केले.






**दिनांक- 28/03/2024 राष्ट्रीय परिषदेचे आयोजन-**

भगिनी मंडळ चोपडा संचालित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनाक-२८/०३/२०२४ गुरुवार राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन मा.जगदीश पाटील, अधिष्ठाता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माअरुणभाई गुजराथी.श्री. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीआशीषभाई गुजराथी, संस्थेच्या अध्यक्ष, सौ.पूनम गुजराथी, उपाध्यक्षा, सौ.छायाबेन गुजराथी उपस्थित होते. तसेच बिजभाषक मा.विनोद सोनवणे, बालहंस समाजकार्य महाविद्यालय, भरूच गुजरात, उपस्थित होते. या दिवशी प्रा.नारसिंग वळवी यांनी लिहीलेल्या "भारतीय समाज समस्याए,परिणाम एवं चुनौतियां या पुस्तकाचे प्रकाशन मई गुजराथी साहेबांचा अरुणभा.श्री. शुभहस्ते करण्यातआले, यावेळी कबचौ उमवि, जळगाव येथील अधिष्टाता माजगदिश पाटील सर संस्थेचा .श्री. पुनमताई.सौ.अध्यक्षा मा, व सर्व मान्यवर उपस्थीत होते.






**दिनांक- 30/03/2024- सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या मतदान जनजागृती-**

सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या मतदान जनजागृती साठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शपथ देतांना महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, निवडणूक अधिकारी, मा. अर्पित चव्हाण, मा.भाऊसाहेब थोरात, मा. युवराज पाटील, मा.प्राचार्य डॉ. सौनदंकार, प्रा.नारसिंग वळवी ,प्रा. गोपाल बडगुजर




**दिनांक १४ एप्रिल २०२४ रविवार**

समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे भारताचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त, महाविद्यालयात भारताचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



- महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.अनंत देशमुख यांनी महामानवांच्या जीवनपटातील प्रसंगांचा उल्लेख करून प्रतिमेस माल्यार्पण केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.राहुल निकम यांनी केले

**विद्यापीठ स्तरीय वार्षिक परीक्षा सुरु-** BSW- **दिनांक- 05/04/2024**
MSW- **दिनांक- 22/04/2024**

**दि.08/05/24 व 24/04/24 - ब्लॉक प्लेसमेंट-**

जे. पी. टेक मल्टिपर्पज फाऊंडेशन, जळगाव या संस्थेचे संचालक श्री.जयंत पाटील सर यांनी आपल्या संस्थेत विद्यार्थ्यांनी 1 महिन्याचे ब्लॉक प्लेसमेंट करावे. याकरीता TYBSW मधील विद्यार्थ्यांना **दिनांक- 24/04/24 रोजी आणि MSW - II मधील विद्यार्थ्यांना दिनांक-08/05/24** रोजी संस्थेची माहिती देऊन, त्यांच्या संस्थेत विद्यार्थ्यांना ब्लॉक प्लेसमेंट करण्यासाठी आवाहन केले.




| NAME OF COLLEGE- BMC'S,COLLEGE OF SOCIAL WORK, CHOPDA, DIST-JALGAON | | | | | | | | | | | | | | | | | | | COLLEGE CODE-140052 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FACULTY AND COURSE - MM&SS- B.S.W. & M.S.W. | | | | | | | | | | | | | | | | | | | | YEAR-2023-24 | | |
| YEAR | INTAKE CAPACITY | SC | | ST | | VJ/DT | | NT-B | | NT-C | | NT-D | | SBC | | OBC | | OPEN | | TOTAL | | TOTAL |
| U.G. | | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| FIRST YEAR | 40+4 | 1 | 1 | 13 | 18 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 0 | 2 | 1 | 2 | 1 | 22 | 21 | **43** |
| SECOND YEAR | 40 | 1 | 1 | 14 | 12 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 5 | 2 | 2 | 0 | 23 | 16 | **39** |
| THIRD YEAR | 40 | 0 | 3 | 5 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 3 | 0 | 0 | 6 | 16 | **22** |
| **TOTAL** | **124** | **2** | **5** | **32** | **37** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** | **0** | **0** | **4** | **3** | **8** | **6** | **4** | **1** | **51** | **53** | **104** |
| **P.G.** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| FIRST YEAR | 60 | 5 | 3 | 10 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 5 | 1 | 3 | 22 | 35 | **57** |
| SECOND YEAR | 60+10 | 7 | 4 | 10 | 2 | 0 | 0 | 3 | 1 | 1 | 3 | 0 | 0 | 4 | 0 | 13 | 15 | 5 | 2 | 43 | 27 | **70** |
| **TOTAL** | **130** | **12** | **7** | **20** | **26** | **0** | **0** | **5** | **1** | **1** | **3** | **0** | **0** | **4** | **0** | **17** | **20** | **6** | **5** | **65** | **62** | **127** |
| **GRANT TOTAL** | **254** | **14** | **12** | **52** | **63** | **0** | **0** | **5** | **1** | **2** | **4** | **0** | **0** | **8** | **3** | **25** | **26** | **10** | **6** | **116** | **115** | **231** |
| CERTIFICATE COURSE | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **Counselling** | 60 | 6 | 4 | 8 | 2 | 0 | 0 | 3 | 3 | 0 | 1 | 1 | 0 | 3 | 1 | 6 | 16 | 5 | 1 | 32 | 28 | **60** |
| **NGO's Manegment** | 60 | 1 | 3 | 14 | 12 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 8 | 4 | 0 | 1 | 24 | 24 | **48** |
| **PG Diploma in Management** | 60 | 3 | 2 | 7 | 23 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 5 | 4 | 0 | 2 | 17 | 33 | **50** |
| **Communication Skill in** | 40 | 0 | 0 | 12 | 18 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | 2 | 1 | 2 | 0 | 19 | 19 | **38** |
| **TOTAL** | **220** | **10** | **9** | **41** | **55** | **0** | **0** | **6** | **3** | **0** | **1** | **1** | **0** | **6** | **7** | **21** | **25** | **7** | **4** | **92** | **104** | **196** |
| RESEARCH CENTER | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **Ph.D.** | **46** | 11 | 6 | 6 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 2 | 1 | 27 | 8 | **35** |

Page 1

तरुण भारत
Main Edition | 2023-09-11 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

## रोटरी क्लबच्यावतीने सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन समाजकार्य महाविद्यालयास भेट



**चोपडा :** येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय येथे रोटरी क्लब ऑफ चोपडा यांच्यावतीने सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन महाविद्यातयाढ सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमासाठी रोटरी ३०३० च्या गव्हर्नर रोटे. आशा वेणुगोपाल ( नाशिक ) यांच्या हस्ते सदर सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी यांना सुपूर्द करण्यात आले. यावेळी भगिनी मंडळ अध्यक्ष पुनम गुजराथी, उद्योजक आशिष गुजराथी, असिस्टंट गवर्व्हर्नर डॉ. राहुल मयूर, रोटरी अध्यक्ष चेतन टाटीया,सेक्रेटरी अर्पित अग्रवाल सर्व रोटरी क्लब सदस्य उपस्थित होते. यावेळी आशा वेणुगोपाल यांनी या मशीनचे आजच्या काळातील महत्व आणि मुलींना आपली स्वतःची आरोग्याची कशी काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

Powered by iDocuments

तरुण भारत
Main Edition | 2023-09-03 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

## चोपडा येथील समाजकार्य महाविद्यालयात आर्थिक साक्षरतेवर उद्‌बोधन



**चोपडा :** येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयात येथे आर्थिक साक्षरता या विषयावर उद्‌बोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी समाजकार्य म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी, प्रमुख वक्ते चोपडा पीपल्स बॅंकेचे शाखाधिकारी मितेश पोतदार,प्रा. डॉ.विष्णू गुंजाळ, डॉ.विनोद रायपुरे, डॉ.मारोती गायकवाड, डॉ.उत्तम सोनकांबळे, प्रा.नारसिंग वळवी, डॉ. संबोधी देशपांडे, ग्रंथपाल कल्पना सोनवणे, ग्रंथालय सहाय्यक रूपाली देसाई, अजय बारी, लिपीक प्रमोद वाघ, परेश चित्ते, प्राथमिक शिक्षक जीतेंद्र जोशी व समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन डॉ.आशिष गुजराथी यांनी केले.

सर्वप्रथम प्रमुख वक्ते मितेश पोतदार यांचे स्वागत प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांनी केले. त्यानंतर प्रत्यक्ष व्याख्यानाला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना मितेश पोतदार यांनी विद्यार्थ्यांना बॅंकिंगविषयीची माहिती दिली. त्यामध्ये एनईएफटी, आरटीजीएस, करंट अकाउंट, सेव्हींग अकाउंट, सीकेवायसी, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, फिक्स डिपॉझिट, रिकरिंग डिपॉझिट, पोस्टाचे व्यवहार याविषयी उदाहरणासह माहिती दिली.

योग्यप्रकारे गुंतवणूक कशी करावी शेअर मार्केट, एसआयपी, म्युच्युअल फंड्स, डिमॅट अकाउंट याविषयीची माहिती दिली. त्यानंतर मेडिकल इन्शुरन्स, टर्म इन्शुरन्स, टीडीएस या संदर्भात विद्यार्थ्यांना सुयोग्य असे म र्गदर्शन केले. त्यानंतर आपण इन्कम टॅक्स कशा पद्धतीने भरावा, त्यासाठी काय करावे याविषयी उदाहरणासह स्पष्टीकरण दिले. कोणकोणत्या ठिकाणी आपण पैसे गुंतवून इन्कम टॅक्समध्ये सूट मिळू शकतो. त्याच्या नियम व अटी काय याची विस्तृत अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

त्यानंतर प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. विनोद रायपुरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सेवक देवेंद्र पाटील व अजय भाट यांनी परिश्रम घेतले.

Powered by iDocuments

लोकमत

# समाजकार्य महाविद्यालयामार्फत आभा कार्ड नोंदणी अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

**चोपडा :** भगिनी मंडळ चोपडा संचालित समाजकार्य महाविद्यालय येथील बीएसडब्ल्यू, एमएसडब्ल्यू विद्यार्थ्यांमार्फत क्षेत्रकार्यांतर्गत तालुक्यातील वैजापूर येथे आभा कार्ड नोंदणी अभियान राबवण्यात आले.

अभियान राबवण्यासाठी प्रा. डॉ. आशिष गुजराथी, प्रा. नारसिंग वळवी यांनी क्षेत्रकार्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अभियानात क्षेत्रकार्याचे विद्यार्थी विशाल भालेराव, नाना साबळे, अरुण भोई, नेहा देशमुख, दीपाली रामोशी आणि क्षेत्र कार्य पर्यवेक्षक प्रा. आशिष गुजराथी, प्रा. नारसिंग वळवी यांनी स्वतः आभा कार्ड नोंदणी केली. खान्यापाडाव या गावातील ५२ व्यक्तींची नोंदणी करण्यात आली.



समाजकार्य महाविद्यालयातर्फे वैजापूर येथे आयोजित आभा कार्ड नोंदणी अभियानात सहभागी झालेले विद्यार्थी. (छाया : शाम जाधव)

यासाठी दुर्गेश पवार, अमित पावरा, हिमानी पाटील, संदीप पावरा, सुवर्णा धनगर, वैष्णवी धनगर, दीपाली चव्हाण, साक्षी परदेशी, आकाश पावरा, रासिंग वसावे, रंगीता पाडवी, सरस्वती पावरा, अजित भिल, लोकेश गवळी, गुणवंत शिरसाठ, उत्कर्ष जगताप, अजय शिरसाठ, सुहास वसावे, नम्रता मावची, जयता वळवी, अश्विनी धनगर आणि वंदना पावरा यांनी परिश्रम घेतले.

Hello Jalgaon Gramin
Page No. 3 Aug 25, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

(अमळनेर) या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

महाजन यांनी मानले.

यांनी परिश्रम घेतले.



चोपड्यातील समाजकार्य महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

## समाजकार्य महाविद्यालय, चोपडा

चोपडा : समाजकार्य महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी, डॉ. अनंत देशमुख, डॉ. विष्णू गुंजाळ, प्रा. नारसिंग वळवी, डॉ. विनोद रायपुरे, डॉ. राहुल निकम, डॉ. मारोती गायकवाड, डॉ. उत्तम सोनकांबळे, डॉ. संबोधी देशपांडे, प्रा. कल्पना सोनवणे, सहायक ग्रंथपाल प्रा. रुपाली देसाई, डिगंबर धनगर व उज्ज्वला वाघ यांच्यासह एकता अग्रवाल, भाग्यश्री महाजन, सेजल शहा उपस्थित होते. यावेळी शिक्षकांचा गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन अरुण भोई तर आभार अनिल बाविस्कर यांनी मानले. यशस्वीतेसाठी विद्यार्थी अनिल बाविस्कर, अरुण भोई, डिगंबर धनगर, अजय शिरसाठ, राहुल कोळी, रोहित रायसिंग, अजित भिल, तय्यब तडवी, अनिता पाटील, उज्ज्वला वाघ, नेहा देशमुख, दीपाली रामोशी, शकुंतला पावरा आदींनी परिश्रम घेतले.

## चहार्डीत मुलींची रक्ततपासणी

चोपडा : येथील भगिनी मंडळ चोपडा, संचालित समाजकार्य महाविद्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्र, चहार्डी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ रोजी चहार्डी गावातील आदिवासी भिल्ल वस्तीतील किशोरवयीन मुलींची सिकलसेल आणि हिमोग्लोबीन रक्त तपासणी करण्यात आली या शिबिरात एकूण ६५ मुली व महिलांची रक्ततपासणी करण्यात आली.

लोकमत

## चोपड्यात रोटरॅक्ट क्लबतर्फे वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**चोपडा :** रोटरॅक्ट क्लब ऑफ चोपडा व समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने ३० जुलै ते ३ ऑगस्टदरम्यान वृक्षलागवड व संवर्धन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

याचा प्रारंभ रविवारी समाजकार्य महाविद्यालयाच्या आवारात उपप्राचार्य प्रा. डॉ. आशिष गुजराथी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाला. यानंतर रामगोपाल गोशाळा, समाजकार्य महाविद्यालय व शासकीय विश्रामगृह या परिसरांत वड, जांभूळ, कडुलिंब, पिंपळ या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमांतर्गत चोपडा शहरासह ग्रामीण भागांत विविध वृक्षांची ट्री-गार्डसह लागवड करून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी रोटरॅक्ट क्लबने स्वीकारली आहे. यावेळी रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष अनिल बाविस्कर, सचिव गौरव जैन, खजिनदार मयूरेश जैन, माजी अध्यक्ष दिव्यांक सावंत, सदस्य मयांक जैन, ॲड. प्रणव ठाकरे, योगेश चौधरी, सौरभ ठाकरे यांच्यासह समाजकार्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. विनोद रायपुरे, कार्यालय अधीक्षक सोमनाथ बारी, लेखापाल अमोल गुजराथी, नितीन पवार, देवेंद्र पाटील, कैलास महाजन आदी उपस्थित होते.

Hello Jalgaon Gramin
Page No. 2 Jul 31, 2023
Powered by: erelego.com

**अभियान •** चोपडा समाजकार्य महाविद्यालयातर्फे आयोजित रक्तदान शिबिरास युवकांचा प्रतिसाद

# शिबिरातून आदिवासी भागामध्ये जनजागृती

प्रतिनिधी | चोपडा

येथील भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालयामार्फत क्षेत्रकार्यांतर्गत वैजापूर येथील शासकीय कन्या आश्रम शाळेत रक्तदान शिबिर उत्साहात झाले. शिबिर समाजकार्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांच्या मार्गदर्शनातून घेण्यात आले. या शिबिरातून आदिवासी व ग्रामीण भागामध्ये प्रथमच रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण झाली. त्यातूनच रक्तदात्यांना मानवता धर्म निभावण्याची संधी मिळाली.

शिबिरात क्षेत्रकार्याचे विद्यार्थी नाना साबळे, दुर्गेश पवार, लोकेश गवळी, गुणवंत शिरसाठ, संदिप पावरा, अजित भिल व क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा.डॉ.आशिष गुजराथी यांनी रक्तदान करून मानवता धर्म निभावला. तसेच वैजापूर, मुळ्यावतार व मेलाणे गावातील युवक चंद्रभान कोळी, लखन भिलाला, संजय पावरा, विजय कोळी, प्रदीप बारेला, शिलाबाई राजपूत, मुकेश बारेला, योगेश बारेला, मनिष भिलाला, सचिन भोई, किरण भिल, आशिष बारेला, संस्थेतील स्कूल ऑफ नर्सिंगच्या द्वितीय वर्षाच्या दुर्गा बारेला, सुनिता पावरा, करुणा पिंप्राळे इत्यादी युवकांनी रक्तदान करून रक्तदानाचे महत्त्व उपस्थित आदीवासी बांधवांना पटवून दिले.



वैजापूर येथे आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना रक्तदाते.

### शिबिरात १९ बॅग रक्त संकलित

रक्त संकलित करण्यासाठी चोपडा येथील इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित, आसकरण ताराचंद जैन रक्त संकलन केंद्राचे व्यवस्थापक सुनिल माळी, सिनियर टेक्निशियन किरण गाडीलोहार, शीतल माळी, आशालता शेटे, विद्या श्रीसुंदर यांनी रक्तसंकलन केले. तसेच स्कूल ऑफ नर्सिंगच्या द्वितीय वर्षाच्या दुर्गा बारेला, सुनिता पावरा, करुणा पिंप्राळे यांनी रक्तपेढी मधील कर्मचाऱ्यांना रक्तसंकलनामध्ये सहकार्य केले. शिबिरात १९ बॅग रक्त संकलित करण्यात आले.

### रक्तदात्यांचा सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरव

शिबिराच्या शेवटी रक्त संकलन परिषदेतर्फे आयोजकांना सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह आणि रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सरपंच दत्तासिंग पावरा, वसतीगृह अधीक्षक सुहास देवराज, कामाठी प्रदीप बारेला, मुकेश बारेला, विनायक नामदेव, शेनपाणी येथील संजू बारेला या मान्यवरांनी उपस्थिती नोंदवली व शिबिर यशस्वितेसाठी विशेष सहकार्य केले. उपप्राचार्य व क्षेत्रकार्य पर्यवेक्षक डॉ.आशिष गुजराथी तसेच प्रा.नारसिंग वळवी यांनी शिबिराचे नियोजन केले.